RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ३१] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १ - ७, २०२४ / श्रावण १० - १६, शके १९४६ [पृष्ठे - १७०

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

नगर विकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक २३ जुलै २०२४

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

सूचना

क्रमांक टीपीएस-१८२४/१०७५/प्र.क्र. ८७/नवि-१३/२०२४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे / विकास प्राधिकरणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नैना, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, हिल स्टेशन नगरपालिका, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचित केलेली संवेदनशील क्षेत्रे व लोणावळा नगरपरिषद, तसेच नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको कार्यरत असलेले क्षेत्र, मिहान, एमएडीसी, एमएसआरडीसी, ही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस ("यूडीसीपीआर") महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदींनुसार, शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१८१८/प्र.क्र. २३६/१८/वियो. व प्रायो./कलम ३७ *(१कक) (ग)* व कलम २० *(४)*/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये मंजुरी दिली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोचे क्षेत्र, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्र, मल्टिमोडल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (मिहान) अधिसूचित क्षेत्र, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. चे (एमएडीसी) शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्र आणि विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिसूचित क्षेत्र, या क्षेत्रांना उक्त मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ *(१कक)* व कलम २० *(३)* अन्वये अनुक्रमे सूचना क्र. टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७ *(१कक)* व कलम २० *(३)*/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० आणि सूचना क्र. टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम २०*(३)*/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० प्रसिद्ध केल्या असून कलम १५४ नुसार अनुक्रमे निर्णय क्र. टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम ३७ *(१कक)* व कलम २० *(३)*/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० आणि निर्णय क्र. टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम २० *(३)*/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये निदेश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, काही उद्योग त्यांचे शहरांमधील युनिट स्थलातरित/बंद करून उद्योग वापराखालील भूखंड निवासी विकासासाठी रूपांतर केले जात असल्याने, विद्यमान क्वार्टर्स असलेल्या कारखाना कामगार/कर्मचारी/भाडेकरूंच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने सुधारणा करण्याबाबत, काही संस्थांकडून शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त निवेदनातील विनंती विचारात घेतल्यानंतर, उक्त नियमावलीतील सूचनेसोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे काही तरतुदी सुधारित करणे आवश्यक आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे) असे शासनाचे मत झाले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१कक)* अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तींचा वापर करून, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिद्ध करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम १६२ *(१)* नुसार प्राधिकृत करण्यात येत आहे.

तसेच शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ *(१)* अन्वये नव्याने निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१कक)* चे उपकलम *(क)* अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अमलात येईल.

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

(१) विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद विभाग.

(२) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.

(३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.

(४) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

(५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

(६) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., मुंबई.

(७) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

(८) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे/नवनगर विकास प्राधिकरणे.

(९) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

(१०) मुख्याअधिकारी, (सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती).

परिशिष्ट 'अ'

शासन नगर विकास विभागाकडील सूचना क्रमांक टीपीएस-१८२४/१०७५/प्र.क्र.८७/नवि-१३/२०२४,
दिनांक २३ जुलै २०२४ सोबतचे सहपत्र

विनियम क्रमांक	याऐवजी	असे वाचावे
१	२	३
3.8.2 (b) Inclusive Housing (For Group Housing Scheme).	(iv) The Landowner/Developer may also be permitted to utilise 1/4th of the total 20 per cent FSI earmarked for Affordable Housing towards construction of Affordable Housing Tenements in the form of service quarters in the same or separate building which shall have to be sold as service quarters only to the purchasers of free sale flats under the said scheme.	(iv) The Landowner/Developer may also be permitted to utilise 1/4th of the total 20 per cent FSI earmarked for Affordable Housing towards construction of Affordable Housing Tenements in the form of service quarters in the same or separate building which shall have to be sold as service quarters only to the purchasers of free sale flats under the said scheme.

परिशिष्ट 'अ'--*चालू*

विनियम क्रमांक	याऐवजी	असे वाचावे
१	२	३
		Provided that, in case of development of erstwhile existing Industries of Industrial plot in Residential Zone having existing quarters for factory workers/staff/ tenants, the Land owner/Developer shall be permitted to utilise the Affordable Housing units of rehabilitation of such existing factory workers/staff/tenants. Also remaining Affordable Housing units, if any, after this rehabilitation, shall be offered to MHADA for allotment. *The developer shall allot such Affordable Housing tenements at the rates which can extend maximum upto rates as mentioned in Regulation No. 3.8.2.(b), (iii).*

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ **www.maharashtra.gov.in** (कायदे / नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

प्रणव कर्पे,

अवर सचिव,
महाराष्ट्र शासन.

Urban Development Department

Mantralaya, Mumbai - 400 032

dated 23rd July 2024

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTICE

No. TPS-1824/1075/CR. 87/UD-13/2024.–– Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations ('UDCPR') for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, other Planning Authorities / Special Planning Authorities / Development Authorities within the limits of Municipal Corporation of Greater Mumbai, MIDC, NAINA, Jawaharlal Nehru Port Trust, Hill Station Municipal Councils, Eco-Sensitive / Eco-Fragile region notified by MoEF and CC and Lonavala Municipal Council and Area under CIDCO's jurisdiction as Planning Authority, PCNTDA, MIHAN, MADC, MSRDC in Maharashtra under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter refferd to as "the said Act") *vide* Notification No. TPS-1818/CR.238/18/DP. and RP./Sec. 37*(1AA)(c)* and Sec. 20*(4)*/UD-13, dated 2nd December 2020 ;

and whereas, to make applicable the said sanctioned Unified Development Control and Promotion Regulations for the area of CIDCO as Planning Authority, for the area of Pimpri-Chinchwad New Town Development Authority, for the area of Multi-Model International Hub Airport Notified area (MIHAN) for Shirdi Airport Notified area of Maharashtra Airport Development Company Ltd., (MADC) as Special Planning Authority and for notified area of Maharashtra State Road Development Corporation as Special Planning

Authority, the Government has published Notices under Section 37*(1AA)* and Section 20 *(3)* of the said Act, bearing No. TPS-1818/CR-236/18/Sec. 37*(1AA)* and Sec. 20*(3)*/UD-13, dated 2nd December 2020 and No.TPS-1818/CR-236/18/Sec. 20*(3)*/UD-13, dated 2nd December 2020 respectively along with directives under Section 154 of the said Act, 1966 *vide* resolutions No. TPS-1818/ CR-236/18/ Sec. 37*(1AA)* and Sec.20*(3)*/UD-13, dated 2nd December 2020 and No. TPS-1818/CR-236/18/Sec.20*(3)*/ UD-13, dated 2nd December 2020 respectively ;

and whereas, some industries are relocating/closing down their unites in cities and converting plots under incdustrial use for residential Development. In this regard representation from various organizations are received by the Government requesting to making improvements in the rehabilitation of existing quarters of factory workers/employees/tenants ;

and whereas, after considering the request in the said representations the Government is of the opinion that, it is necessary to modify some provisions in the said Regulations as mentioned in Schedule 'A' appended with this Notice (hereinafter reffered to as "the said Modification").

Now therefore, in exercise of the powers conferred under Section 37*(1AA)* of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions / objections from general public in respect to the said modification. Any objections / suggestions upon the said modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the Concerned Divisional Joint Director of Town Planning, Pune Division, Pune who is hereby authorised under Section 162*(1)* of the said Act as an "Officer" to hear objections / suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government.

Further, the Government hereby issues directives under Section 154*(1)* of the said Act that, pending sanction to the proposed modification under clause *(c)* of Section 37*(1AA)* of the said Act by the Government, the proposed modification shall come into force forthwith.

This notice is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all working days.

(1) The Divisional Joint Director of Town Planning, Konkan/Pune/Nashik/Nagpur/Amravati/Aurangabad.

(2) The Commissioner, All concerned Municipal Corporations.

(3) The Collectors, All Districts.

(4) The Metropolitan Commissioners, All Metropolitan Regions Development Authorities.

(5) Office of the Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.

(6) Ofice of the Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8th Floor, World Trade Centre, Mumbai-5.

(7) The Chief Executive Officer, Kolhapur Urban Area Development Authority, Kolhapur.

(8) All Special Planning Authorities/New Town Development Authorities.

(9) The Chief Executive Officer, All Zilla Parishads.

(10) The Chief Officers, All Municipal Councils/Nagarpanchyats.

Annexure- 'A'

Accompaniment to the Government in Urban Development Department Notice bearing No.TPS-1824/1075/CR-87/UD-13/2024, dated 23rd July 2024

Regulation No.	Instead of	Read as
1	2	3
3.8.2 (b) Inclusive Housing (For Group Housing Scheme).	(iv) The Landowner/Developer may also be permitted to utilise 1/4th of the total 20 per cent FSI earmarked for Affordable Housing towards construction of Affordable Housing Tenements in the form of service quarters in the same or separate building which shall have to be sold as service quarters only to the purchasers of free sale flats under the said scheme.	(iv) The Landowner/Developer may also be permitted to utilise 1/4th of the total 20 per cent FSI earmarked for Affordable Housing towards construction of Affordable Housing Tenements in the form of service quarters in the same or separate building which shall have to be sold as service quarters only to the purchasers of free sale flats under the said scheme. *Provided that, in case of development of erstwhile existing Industries of Industrial plot in Residential Zone having existing quarters for factory workers/staff/ tenants, the Land owner/Developer shall be permitted to utilise the Affordable Housing units of rehabilitation of such existing factory workers/staff/tenants. Also remaining Affordable Housing units, if any, after this rehabilitation, shall be offered to MHADA for allotment.* *The developer shall allot such Affordable Housing tenements at the rates which can extend maximum upto rates as mentioned in Regulation No. 3.8.2.(b), (iii).*

This notice is also available on the Government website **www.maharashtra.gov.in** (Acts / Rules)

By the Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary to Government.

नगर विकास विभाग,

चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ११ जुलै २०२४

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम, १९६६

शुद्धिपत्रक

क्रमांक टीपीएस-१८१५/४२८/प्र.क्र. १३८/१५/शुद्धिपत्रक/नवि.-१३.— ज्याअर्थी, शासनाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेमधील जुन्या व वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील नदीकाठच्या निळी पूररेषा (निषेधक पूररेषा) ते लाल पूररेषा (महत्तम / नियंत्रक पूररेषा) व लाल पूररेषेबाहेरील ना विकास वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र (हरितपट्टा/विभाग) रहिवास वापर

विभागात समाविष्ट करण्याबाबतचा फेरबदल (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून संबोधिलेली आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(२)* अन्वये अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१५/४२८/प्र.क्र. १३८/१५/नवि-१३ , दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ अन्वये मंजूर केला आहे (यापुढे "उक्त अधिसूचना" म्हणून संबोधिलेली आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेमध्ये काही बदल करण्याबाबतचा प्रस्ताव, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका , पिंपरी यांनी क्रमांक नरवि/कावि/रावेत/९/१३८/२०२३ , दिनांक १२ जून २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा प्रस्ताव व त्यासोबत प्राप्त कागदपत्रांचे अवलोकन करता, उक्त अधिसूचनेमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे/आणि त्याकरिता सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे शुद्धिपत्रक निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी , सदर बदल करण्यासाठी सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे शुद्धिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे ;

शुद्धिप्रत्रकाची प्रत नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांचे कार्यालयात उपलब्ध राहील.

परिशिष्ट

(शासन नगर विकास विभाग शुद्धिपत्रक क्रमांक टीपीएस-१८१५/४२८/प्र.क्र. १३८/१५/शुद्धिपत्रक/नवि-१३, दिनांक ११ जुलै २०२४ सोबतचे प्रपत्र)

या ऐवजी				**असे वाचावे**			
अ. क्र.	गावाचे नाव	स.नं. / सि.स.नं.	फेरबदला-खालील क्षेत्र (चौ.मी.)	अ. क्र.	गावाचे नाव	स.नं. / सि.स.नं.	फेरबदला-खालील क्षेत्र (चौ.मी.)
१	२	३	४	१	२	३	४
४	चिंचवड	स.नं. १७/२-क पै., सि.स.नं. २०१९ पै.	३०००	४	चिंचवड	स.नं. १७/२-क पै., सि.स.नं. २०१९ पै., २०२० पै., २०२१ पै., २०२६ पै.	३०००
७	चिंचवड	स.नं. १७/२-ब पै., सि.स.नं. २०२० पै.	१५००	७	चिंचवड	स.नं. १७/२-ब पै., सि.स.नं. २०२० पै., २०२१ पै. व २०२५ पै.	१५००
८	चिंचवड	स.नं. १७/२-ड पै.	१५००	८	चिंचवड	स.नं. १७/२-ड पै. सि.स.नं. २०१८ पै., २०१९ पै., २०२० पै. व २०२६ पै.	१५००
९	चिंचवड	स.नं. १७/२-ड पै., सि.स.नं. २०१८	१५००	९	चिंचवड	स.नं. १७/२-ड पै., सि.स.नं. २०१८ पै., २०१९ पै., २०२० पै. व २०२६ पै.	१५००
११	चिंचवड	स.नं. १७/२-ब पै., सि.स.नं. २०२० पै.	१५००	११	चिंचवड	स.नं. १७/२-ब पै., सि.स.नं. २०२० पै., २०२१ पै. व २०२५ पै.	१५००
१५	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१७.	१३५०	१५	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१७ पै., २०१८ पै., २०१९ पै., २०२५ पै. व २०२६ पै.	१३५०
१६	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१७ पै.	२०००	१६	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१६ पै., २०१७ पै., २०१८ पै., २०१९ पै. व २०२६ पै.	२०००
१७	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१७ पै.	२६७५	१७	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१६ पै., २०१७ पै., २०१८ पै., २०१९ पै. व २०२६ पै.	२६७५

परिशिष्ट--*चालू*

या ऐवजी--*चालू*				**असे वाचावे**--*चालू*			
अ. क्र.	गावाचे नाव	स.नं. / सि.स.नं.	फेरबदला-खालील क्षेत्र (चौ.मी.)	अ. क्र.	गावाचे नाव	स.नं. / सि.स.नं.	फेरबदला-खालील क्षेत्र (चौ.मी.)
१	२	३	४	१	२	३	४
१८	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१७ पै.	२०००	१८	चिंचवड	स.नं. १७/३ पै., सि.स.नं. २०१७ पै., २०१८ पै., २०१९ पै., २०२५ पै. व २०२६ पै.	२०००
४०	चिंचवड	स.नं. ८३/२/३/४/३ पै., सि.स.नं. २१३१ पै.	३००	४०	चिंचवड	स.नं. ८३/२/३/४/३ पै., सि.स.नं. २१३१ पै. व २१३२.	३००
९१	चिंचवड	स.नं. १३/१ पै., सि.स.नं. २०१२, २०१३ पै.	४६४	९१	चिंचवड	स.नं. १३/१ पै., सि.स.नं. २०५६ ते २०७६ पै.,	४६४
९२	चिंचवड	स.नं. १३/१ पै., सि.स.नं. २०१३ पै.	३४०	९२	चिंचवड	स.नं. १३/१ पै., सि.स.नं. २०११ पै.	३४०
१३६	चिंचवड	स.नं. ४७/११, ४७/१२ पै., सि.स.नं. २०९५ व २०७२ पै.	१९२	१३६	चिंचवड	स.नं. ४७/११, ४७/१२ पै., सि.स.नं. २०९४ व २०९५ पै.	१९२
१३७	चिंचवड	स.नं. ४७/११ व ४७/१२ पै., सि.स.नं. २०९५ व २०७२ पै.	१४४	१३७	चिंचवड	स.नं. ४७/११, ४७/१२ पै., सि.स.नं. २०९४ व २०९५ पै.	१४४
१४१	चिंचवड	स.नं. ४७/११ व ४७/१२ पै., सि.स.नं. २०९५ व २०७२ पै.	१००	१४१	चिंचवड	स.नं. ४७/११, ४७/१२ पै., सि.स.नं. २०९४ व २०९५ पै.	१००
१५६	चिंचवड	स.नं. ८०/२/३/४/१/३ पै., सि.स.नं. २१२८ पै.	४३३	१५६	चिंचवड	स.नं. ८०/२/३/४/१/३ पै., सि.स.नं. २१३८ पै.	४३३

सदरहू शुद्धिपत्रक शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रणव कर्पे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated 11th July 2024

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

Corrigendum

No. TPS-1815/428/CR-138/15/Corrigendum/UD-13.—Whereas, in accordance with sub-section *(2)* of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the said Act) the State Government has sanctioned the Modification regarding the inclusion of the area in the Blue Flood Line to Red Flood Line and area outside the Red Flood Line, shown as No Development Zone (Green Belt / Zone) of the Sanction Development Plan of Pimpri-Chinchwad Municipal Corporation

and the Pimpri-Chinchwad New Town Development Authority (hereinafter referred to as "the said Modification") *vide* Notification No. TPS-1815/428/CR-138/15/UD-13, dated 8th November 2021 (hereinafter referred to as "the said Notification") ;

and whereas, the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri has submitted a proposal to the Government for certain changes in the said Notification *vide* Marathi letter क्रमांक नरवि/कावि/रावेत/९/१३८/२०२३, dated 12th June 2023 ;

and whereas, on examining the proposal of the Pimpri-Chinchwad Municipal Corporation and the documents attached along with the application, the Government is of the opinion that it is necessary to issue Corrigendum for the same as mentioned in Annexure attached hereto ;

Now, therefore this Corrigendum is being issued in respect of such changes in the said Notification as per Annexure attached hereto ;

Copy of this Corrigendum is kept open for the inspection of the public in the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri office during office hours on all working days.

Annexure

(Accompaniment to the Government in Urban Development Department Notification No. TPS-1815/428/C.R. 138/15/Corrigendum/UD-13, dated 11th July 2024)

Instead of				**Read as**			
Sr. No.	Village Name	S. No. / C.T.S. No.	Area in Sq. mtrs.	Sr. No.	Village Name	S. No. / C.T.S. No.	Area in Sq. mtrs.
1	2	3	4	1	2	3	4
4	Chinchwad	S. N. 17/2/C (pt.), C.T.S. 2019 (pt.).	3000	4	Chinchwad	S. N. 17/2 C (pt.), C.T.S. 2019(pt.), 2020 (pt.), 2021 (pt.), 2026 (pt.).	3000
7	Chinchwad	S. N. 17/2/B (pt.), C.T.S. 2020 (pt.).	1500	7	Chinchwad	S. N. 17/2-B (pt.), C.T.S. 2020 (pt.), 2021 (pt.) and 2025 (pt.).	1500
8	Chinchwad	S. N. 17/2/D (pt.)	1500	8	Chinchwad	S. N. 17/2/D (pt.), C.T.S. 2018 (pt.)., 2019 (pt.), 2020 (pt.) and 2026 (pt.).	1500
9	Chinchwad	S. N. 17/2/D (pt.), C.T.S. 2018.	1500	9	Chinchwad	S. N. 17/2/D (pt.), C.T.S. 2018 (pt.), 2019 (pt.), 2020 (pt.) and 2026 (pt.).	1500
11	Chinchwad	S. N. 17/2/B (pt.), C.T.S. 2020 (pt.).	1500	11	Chinchwad	S. N. 17/2/B (pt.), C.T.S. 2020 (pt.), 2021 (pt.) and 2025 (pt.).	1500
15	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2017.	1350	15	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2017 (pt.), 2018 (pt.), 2019 (pt.), 2025 (pt.) and 2026(pt.).	1350

Annexure--*contd.*

Instead of--*contd.*				**Read as--***contd.*			
Sr. No.	Village Name	S. No. / C.T.S. No.	Area in Sq. mtrs.	Sr. No.	Village Name	S. No. / C.T.S. No.	Area in Sq. mtrs.
1	2	3	4	1	2	3	4
16	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2017 (pt.).	2000	16	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2016 (pt.), 2017 (pt.), 2018 (pt.), 2019 (pt.) and 2026 (pt.)	2000
17	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2017 (pt.).	2675	17	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2016 (pt.), 2017 (pt.), 2018 (pt.), 2019 (pt.) and 2026 (pt.).	2675
18	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2017 (pt.).	2000	18	Chinchwad	S. N. 17/3 (pt.), C.T.S. 2017 (pt.), 2018 (pt.), 2019 (pt.), 2025 (pt.) and 2026 (pt.).	2000
40	Chinchwad	S. N. 83/2/3/4/3 (pt.), C.T.S. 2131 (pt.).	300	40	Chinchwad	S. N. 83/2/3/4/3 (pt.), C.T.S. 2131 (pt.) and 2132.	300
91	Chinchwad	S. N. 13/1 (pt.), C.T.S. 2012, 2013 (pt.).	464	91	Chinchwad	S. N. 13/1 (pt.), C.T.S. 2056, to 2076 (pt.).	464
92	Chinchwad	S. N. 13/1 (pt.), C.T.S. 2013 (pt.).	340	92	Chinchwad	S. N. 13/1 (pt.), C.T.S. 2011 (pt.).	340
136	Chinchwad	S. N. 47/11, 47/12 (pt.), C.T.S. 2095 and 2072 (pt.).	192	136	Chinchwad	47/11, 47/12 (pt.), C.T.S. 2094, 2095 (pt.).	192
137	Chinchwad	S. N. 47/11 and 47/12 (pt.), C.T.S. 2095 and 2072 (pt.).	144	137	Chinchwad	S. N. 47/11, 47/12 (pt.), C.T.S. 2094 and 2095 (pt.).	144
141	Chinchwad	S. N. 47/11 and 47/12 (pt.), C.T.S. 2095 and 2072 (pt.).	100	141	Chinchwad	S. N. 47/11, 47/12 (pt.), C.T.S. 2094 and 2095 (pt.).	100
156	Chinchwad	S. N. 80/2/3/4/1/3 (pt.), C.T.S. 2128 (pt.)	433	156	Chinchwad	S. N. 80/2/3/4/1/3 (pt.), C.T.S. 2138 (pt.)	433

This Corrigendum is published on the Government website *www.maharashtra.gov.in* (Acts/Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary to the Government.

संचालक नगर रचना यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक प्रा.यो.,पुणे/मौ. वाघोली व मांजरी/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/३८८५/२०२४.— ज्याअर्थी, पुणे प्रदेशाची प्रादेशिक योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९५/२२७/प्र.क्र. २६/९५/नवि-१३, दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५ *(१)* (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) चे तरतुदीन्वये विकास नियंत्रण नियमावलीसह मंजूर केली असून ती दिनांक १० फेब्रुवारी १९९८ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोटकलम *(४)* मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०४/पुणे प्रा.यो. विनिनि/नवि-१३, दिनांक १६ नोव्हेंबर २००५ आणि पूरक पत्र क्रमांक टीपीएस-१८०४/ पुणे प्रा.यो. विनिनि/नवि-१३/पूरक पत्र, दिनांक ६ जानेवारी २००६ द्वारे उक्त प्रादेशिक योजनेच्या क्षेत्रात उक्त प्रादेशिक योजनेकरिता लागू असलेली मंजूर विकास नियंत्रण नियमावली सुधारित करून विशेष नगर वसाहतीच्या विकसनासाठीची नियमावली अंतर्भूत केली आहे व ती वेळोवेळी सुधारित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ मधील कलम ३ चे उपकलम *(१)* च्या तरतुदीमधील अधिकाराचा वापर करून शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक पीआरडी-३३१६/प्र.क्र. ५४/नवि-७, दिनांक ११ जुलै २०१६ अन्वये उक्त प्रादेशिक योजनेतील महानगर क्षेत्रासाठी विशेषकरून त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्राकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने त्यांचेकडील शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१७/प्र.क्र. १७३/१७/नवि-१३, दिनांक १८ जानेवारी २०१८ अन्वये उक्त विकास प्राधिकरणाची, उक्त अधिनियमाचे कलम ४० *(१)* चे तरतुदीन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त महानगर क्षेत्रासाठी नियुक्ती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, एल. के. डेव्हलपर्स यांनी (यापुढे "उक्त प्रकल्प प्रवर्तक" असा करण्यात आलेला आहे) मौजे-मांजरी खु. व वाघोली, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सुमारे ४०.०९६४ हे. या क्षेत्राच्या जमिनींवरील प्रस्तावित केलेल्या विशेष नगर वसाहत प्रकल्पास शासनाच्या नगर विकास विभागाने शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०७/२४५/प्र.क्र. ६४१/०७/नवि-१३, दिनांक ४ एप्रिल २००८ अन्वये व त्यानंतर शासनाच्या नगर विकास विभागाने शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०७/२४५/प्र.क्र. ६४१/०७/नवि-१३, दिनांक ४ डिसेंबर २००८ रोजी मौजे मांजरी खु. येथील १.२५५ हे. क्षेत्र उक्त अधिसूचित क्षेत्रात समाविष्ट करून एकूण सुमारे ४१.३५१४ हे. क्षेत्र विशेष नगर वसाहत प्रकल्प क्षेत्र म्हणून अधिसूचित करून स्थानीय मंजुरी देण्यात आली आहे, (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्प" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाकडून दिनांक ९ एप्रिल २०१० रोजीचे प्रमाणपत्रानुसार एल.के. डेव्हलपर्स या कंपनीचे नाव कुल डेव्हलपर्स प्रा. लि., असे बदलण्यात आले आहे व त्यानंतर केंद्र शासनाच्या दिनांक २१ मे २०१८ रोजीचे प्रमाणपत्रानुसार कुल डेव्हलपर्स प्रा. लि., या कंपनीचे नाव ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि., असे झालेले आहे व त्यानुसार उक्त क्षेत्र विहितरित्या अर्जदार कंपनीकडे हस्तांतरित झालेले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१८/१३४९/प्र.क्र. २२९/१८/२० *(४)*/नवि-१३, दिनांक २० नोव्हेंबर २०१८ द्वारे विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रामधील एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली अंतर्भूत केली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) धोरणामध्ये बदल करण्यासाठी, विनियम क्रमांक १४.१ मध्ये फेरबदल प्रस्तावित करून, उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१ क क)(क)* व २० *(३)* चे तरतुदीन्वयेची सूचना क्रमांक १८२१/४५२/प्र.क्र. १०५/२०२२/नवि-१३, दिनांक ५ मार्च २०२४ नुसार प्रसिद्ध केली असून, सदर फेरबदलाची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी सदर फेरबदलाची मंजुरीची वाट न पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १५४ चे तरतुदीन्वये निदेश दिलेले आहेत आणि उक्त सूचनेच्या तळटीपेनुसार, प्रस्तावित फेरबदलाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी NAINA, CIDCO, MSRDC आणि PMRDA या नियोजन प्राधिकरणांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमधील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) विनियमामध्ये उक्त फेरबदलानुसारच्या तरतुदी लागू राहतील व NAINA, CIDCO, MSRDC आणि PMRDA यांच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील कोणताही बदल प्रस्तावित नसलेल्या प्रचलित ITP क्षेत्राशी संबंधित तरतुदी आहेत तशा लागू राहणार आहेत (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र पुणे महानगर प्रदेशांतर्गत येत असल्याने, उक्त प्राधिकरणाने दिनांक २१ नोव्हेंबर २०१९ रोजी उक्त नियमावलीमधील विनियम क्रमांक ६.१ नुसार उक्त अधिसूचित क्षेत्राच्या एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या ४०.४४९७ हे. क्षेत्राच्या द्वितीय सुधारित बृहत आराखड्यास काही अटी व शर्तीसापेक्ष मान्यता दिली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी मौजे वाघोली व मांजरी तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सुमारे ४१.३५१४ हे. या क्षेत्राच्या जमिनीवर प्रस्तावित केलेल्या एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पात, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मौजे वाघोली येथील २०.१४५० हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्रमांक प्रा.यो., पुणे/मौजे मांजरी खु., वाघोली/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/२९८६, दिनांक २७ ऑक्टोबर २०२० अन्वये आणि शासनाच्या नगर विकास विभागाने शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२१/१६६१/प्र.क्र. १३८/२०२२/ नवि-१३, दिनांक २० फेब्रुवारी २०२३ अन्वये ५.८६४ हे. वाढीव क्षेत्र अधिसूचित करून स्थानिय मंजुरी दिली आहे. त्यानुसार स्थानिय मंजुरी दिलेले एकूण क्षेत्र ६७.३६०४ हे. इतके आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आता उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी उक्त नियमावलीतील विनियम क्रमांक ४.५ मधील तरतुदीनुसार मौजे मांजरी खु., तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील स.नं. १२६ व १६१ आणि मौजे वाघोली, तालुका हवेली, जिल्हा पुणे स.नं. १२५५/३४, १२५५/ ३६, १२७६/२० व १२७६/२१, एकूण क्षेत्र २.४२२१ हे. क्षेत्र उक्त प्रकल्पाच्या क्षेत्रात नव्याने समाविष्ट करून उक्त प्रकल्प राबविण्यासाठी सुधारित स्थानीय मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर २०२३, दिनांक ४ जानेवारी २०२४ व दिनांक ७ फेब्रुवारी २०२४, दिनांक १२ मार्च २०२४ व दिनांक १८ जून २०२४ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयाकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार सदरच्या वाढीव प्रकल्प क्षेत्रातील जमिनी ह्या "शेती तथा नाविकास" विभागामध्ये समाविष्ट आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार सदरच्या वाढीव प्रकल्प क्षेत्रातील जमिनी ह्या "शेती तथा नाविकास" विभागामध्ये समाविष्ट असून २४ मीटर व ३० मीटर रुंद रस्त्याने बाधित होत आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार उक्त प्रकल्पात अंतर्भूत करणेचे प्रस्तावित असलेल्या उक्त वाढीव जमिनींची मालकी आणि विकसन अधिकार प्रकल्प प्रवर्तक यांनी संपादित केले आहेत आणि त्या संबंधानेच्या महसूल अभिलेखाप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक यांनी त्या परिणामी प्रतिज्ञापत्र सादर केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचे विनंतीवरून उक्त नियमावलीतील विनियम क्रमांक ४.५ नुसार एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी स्थानीय मंजुरी दिलेल्या क्षेत्राच्या ५० टक्क्यांपर्यंत क्षेत्र प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यास किंवा वगळण्यास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे मान्यता देऊ शकतात, अशी तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी विनंती केल्यानुसार उक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाचे क्षेत्र हे शासनाने स्थानीय मंजुरी दिलेल्या एकूण ६७.३६०४ हे. क्षेत्राच्या ५० टक्के मर्यादेत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या जमिनींचे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम १८ चे पोटकलम ३ नुसार उक्त प्रादेशिक योजना नकाशावर निर्देशित करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, रहिवास व वाणिज्य वापराव्यतिरिक्तच्या अन्य वापर विभागात अंतर्भूत उक्त वाढीव जमिनीकरिता उक्त प्रकल्प अनुज्ञेय करण्यासाठी उक्त नियमावलीतील विनियम क्रमांक ७.१.२ नुसार भराव्या लागणाऱ्या अधिमूल्यापैकी स्थानीय मंजुरीच्या टप्प्यावरील १० टक्क्यांप्रमाणे रक्कमेचा भरणा रुपये ७,२९,५००/- चलन क्रमांक GRNMH००४९३१७३७२०२४२५P, दिनांक ९ जुलै २०२४, डिफेज्ड क्रमांक ००२७६६५४१२०२४२५, दिनांक १२ जुलै २०२४ अन्वये प्रकल्प प्रवर्तकाने सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांच्यामार्फत शासकीय कोषागारात केला आहे.

त्याअर्थी, आता, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूची 'अ' मध्ये सविस्तरपणे नमूद केलेले, २.४२२१ हे. इतके क्षेत्र, यापूर्वी उक्त स्थानीय मंजुरी प्राप्त असलेल्या उक्त प्रकल्प क्षेत्रात अंतर्भूत करण्यास उक्त नियमावली मधील विनियम क्रमांक ४.५ चे अंतर्गत खालील अटीं व शर्तींस अधीन राहून मान्यता देत आहेत ;

एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी अटी व शर्ती :

मालकी हक्कासंबंधित.--

(१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रांसह उक्त वाढीव जमिनींचे क्षेत्राचे सर्व मालकी/विकसन हक्क उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडे असणे आवश्यक राहील. उद्देश पत्राकरिता अर्ज करताना नोंदणीकृत सामंजस्य कराराची प्रत, संयुक्त उपक्रमाची नोंदणीकृत कागदपत्रे, मूळ मोजणी नकाशे, मालकी हक्क, विकास हक्क सिद्ध करणाऱ्या कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रती संबंधित प्राधिकरणाकडे सादर करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि. व मांजरी हाउसिंग प्रोजेक्टस एलएलपी या अर्जदार कंपनीशी मे. वाघोली प्रॉप्रर्टीज या कंपनीचे अथवा या कंपनीचे भागीदार श्री. अशोक धनराज चोरडीया व विमलादेवी रांका यांचे हितसंबंध स्पष्ट होत नाहीत. स.नं. १२५५/३४ या जमिनीचे ७/१२ उताऱ्यावर भोगवटादार सदरी मे. वाघोली प्रॉप्रर्टीज तर्फे भागीदार श्री. अशोक धनराज चोरडीया यांचे नाव नमूद असलेने, या जमिनीशी विमलादेवी रांका यांचे हितसंबंध स्पष्ट होत नाहीत. यास्तव प्रस्तुत वाढीव क्षेत्राच्या अनुषंगाने उद्देशपत्र (LOI) देणेपूर्वी, स.नं. १२५५/३४ या जमिनीची मालकी तसेच कंपन्यांचे आपापसात झालेले नोंदणीकृत करारनामा अथवा मालकीसंबंधाने अन्य दस्तऐवज याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी खातरजमा करणे आवश्यक राहील.

(३) उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून देण्यात आलेले अधिकृत मोजणी नकाशे उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावांतर्गत समाविष्ट करावयाच्या जमिनी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करणे आवश्यक आहेत. जर उक्त वाढीव जमिनी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्गतच्या अशा जमिनींशी सलग राहत नसतील तर अशा जमिनींचे क्षेत्र उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून आपोआप वगळल्या जातील व अशा क्षेत्रात उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प राबविता येणार नाही.

(४) इरादा पत्र देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये अंतर्भूत जमिनींपैकी भूधारणा पद्धती भोगवटा वर्ग-२, सरकार व नवीन शर्तीच्या जमिनीसंदर्भाने व इतर हक्कात नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमान्वयेचे घोषित अतिरिक्त क्षेत्र, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाचे कलम २० योजनेचे क्षेत्र इत्यादींबाबत आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांनी करणेची आहे.

(५) बृहत आराखड्यास अंतिम मंजुरी देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्भूत जमिनींच्या ७/१२ उताऱ्यांवरील इतर हक्क स्तंभात नमूद बँकेचे भार व नावे असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी पडताळणी करावी व नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

(६) उक्त प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कोणतेही दस्तऐवज खोटे असल्याचे भविष्यात उघडकीस आल्यास किंवा उक्त प्रकल्पाबाबत भविष्यात न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याबाबत स्वतःच्या जबाबदारी व खर्चाने उपाययोजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी उक्त प्रकल्प प्रवर्तकांची राहील. अशा परिस्थितीत अशा जमिनीसाठी देण्यात आलेली स्थानीय मंजुरी रद्द समजण्यात येईल.

(II) पर्यावरण व इतर अनुषंगिक बाबी.--

(१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या जमिनींमध्ये कोणतेही विकास/बांधकाम हाती घेणेपूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय आणि योग्य त्या प्राधिकरणाची पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) घेणे आवश्यक राहील, तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडील पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिनियम, १९८६ अंतर्गत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेमधील अटी व शर्तींचे पालन करणे प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील घनकचऱ्याची आणि सांडपाण्याची विल्हेवाट सुरक्षितपणे लावण्यासाठी योग्य ती व्यवस्था उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वतःच्या जबाबदारीवर व स्वखर्चाने आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे व तसेच त्यासंबंधीच्या अधिनियमातील तरतुदी व नियमानुसार करणे आवश्यक राहील, तसेच जलसंधारण व जलपुनर्भरण याकरिता संबंधित विभागाचे सहमतीने उपाययोजना करणे प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(३) प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या जमिनींचे वाढीव क्षेत्राबाबतचे जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही, या अनुषंगाने असे प्रमाणपत्र प्रकल्पास इरादा पत्र (Letter of Intent) मिळणेपूर्वी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

राज्य शासनाचे जलसंपदा विभाग व अन्य संबंधित विभाग वेळोवेळी विहित करतील, त्या अटी व शर्तींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील. उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून विद्यमान पाण्याचे स्रोत/नाल्याचा प्रवाह असल्यास तो बंद करता येणार नाही.

प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या जमिनींबाबत आवश्यकतेनुसार पुनर्स्थापना खर्चाबाबत जलसंपदा विभागाचे प्रमाणपत्र/ना-हरकत प्रमाणपत्र, प्रकल्पास इरादा पत्र (Letter of Intent) मिळणेपूर्वी जिल्हाधिकारी यांनी घेणे आवश्यक राहील.

(४) प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या जमिनी, अदिवासींच्या नसलेबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी अपर तहसिलदार लोणीकाळभोर, तालुका हवेली, यांचे पत्राची छायापत्र सादर केली आहे. सदर पत्रावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही. त्यामुळे सदर पत्राच्या सत्यतेबाबत जिल्हाधिकारी यांनी इरादा पत्र (Letter of Intent) देणेपूर्वी पडताळणी करणे आवश्यक राहील.

(५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीमधील विनियम क्रमांक १०.५ *(अ)* नुसार पाणीपुरवठा उक्त प्रकल्प प्रवर्तकाने त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीने करणे आवश्यक राहील. जलसंपदा विभागाकडून या अनुषंगाने वेळोवेळी दिलेल्या अटींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त एकात्मिकृत नगर वसाहतीकरिताच्या नियमावलीतील विनियम क्रमांक १०.५ *(क)* नुसार वीजपुरवठा उक्त प्रकल्प प्रवर्तकाने त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीवर पुरविणे आवश्यक राहील, तसेच उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीतील विनियम क्रमांक ६.५ नुसार उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचा बृहत आराखडा मंजूर करणेपूर्वी संबंधित प्राधिकरणाने उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून वीजपुरवठा करणाऱ्या कंपनीकडून उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या संपूर्ण क्षेत्राकरिता आवश्यक परवानगी आणि तसेच वीजपुरवठ्याची दृढवचनबद्धता (Firm Commitment of Power Supply for the entire township from the power supply company) प्राप्त करणे आवश्यक राहील.

(७) प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील जमिनी या एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(III) विकासासंबंधाने.--

(१) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राने वेढल्या गेलेल्या अन्य खाजगी व्यक्तींच्या जमिनींसाठी नियमावलीनुसार आवश्यक परंतु किमान ९.०० मीटर रुंदीचा पोहोच मार्ग विनामोबदला उपलब्ध करून देणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राच्या जमिनींमधून जाणाऱ्या विद्यमान सार्वजनिक रस्त्यांच्या वहिवाटीचे हक्क अबाधित ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(३) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रांमधील ओहोळ/नाल्यांवर संबंधित विभागाच्या परवानगीने सी.डी. वर्क करणे आणि उक्त एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत नदी, नाले, कॅनॉल, तलाव आणि इतर जलस्रोतांपासून उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीनुसार आवश्यक ते अंतर ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(४) प्रादेशिक योजना नकाशावर विशेषत: दर्शविले असले अथवा नसले तरीही अधिकृत कंटूर नकाशानुसार १:५ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्र उताराचे क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय नाही, तसेच या क्षेत्रामध्ये जमिनीची खोदाई / सपाटीकरण / भराव, इत्यादी विकास कार्य अनुज्ञेय होणार नाही.

(५) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट होणाऱ्या लोकसंख्येसाठी नियमानुसार आवश्यक असणारी सार्वजनिक प्रयोजनासाठीची आरक्षणे आणि तसेच मूलभूत सुविधा यासाठी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये सुयोग्य स्थानी नियोजन आणि निश्चित करून ती उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वखर्चाने विकसित करणे बंधनकारक राहील.

(६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये प्रत्येक इमारतीकरिता Rain Water Harvesting यंत्रणा उभारणी व कार्यान्वित करणे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(७) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील प्रत्येक इमारतीमधील वापरण्यात येणाऱ्या पाण्यासंदर्भात Waste Water Recycling ची प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर होईल, याबाबतची सुविधा यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(८) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये सौर ऊर्जा वापर यंत्रणा उभारणी आणि कार्यान्वयन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(IV) इतर अटी व शर्ती.--

(१) या अधिसूचनेत नमूद अटी/शर्तींसह शासनाने उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या मूळ स्थानीय मंजुरीच्या वेळी दिनांक ४ एप्रिल २००८, दिनांक ४ डिसेंबर २००८, दिनांक २० फेब्रुवारी २०२३ व संचालनालयाकडील दिनांक २७ ऑक्टोबर २०२० रोजीच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी/शर्ती उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रासाठी लागू राहतील.

(२) उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून अटी/शर्तींचा भंग झाल्यास या अधिसूचनेद्वारे प्रदान करण्यात आलेली स्थानीय मंजुरी रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात येत आहे. अशा स्थितीत स्थानीय मंजुरी रद्द झाल्यास शासनाकडे जमा केलेले अधिमूल्य किंवा इतर रक्कम उक्त प्रकल्प प्रवर्तक यांना परत मिळणार नाही.

(३) उक्त एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी शासनाने दिनांक २० नोव्हेंबर २०१८ रोजी मंजूर केलेली विकास नियंत्रण नियमावली त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या फेरबदलासह लागू राहील.

(४) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राकरिता उक्त नियमावलीमधील विनियम क्रमांक ७.५ Share of Local/ Planning Authority नुसारच्या तरतुदी लागू राहतील.

(५) सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

(६) प्रस्तावाखालील स्थानीय मंजुरी प्राप्त उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या उक्त वाढीव जमिनींचा तपशील सोबतच्या "अनुसूची-अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे तसेच वाढीव जमिनींसह उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाची हद्द दर्शविणारा नकाशा "अनुसूची-ब" अधिसूचनेसोबत जोडला आहे.

(७) पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या प्रारूप/अंतिम विकास योजनेमधील विकास योजना रस्ते, आरक्षणे व प्रस्ताव सदर एकात्मिकृत नगर वसाहतीमध्ये कायम ठेवून त्यांचा विकास करून, त्या सुविधा सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देणे प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करावयाच्या उक्त वाढीव जमिनींचा तपशील आणि हद्दी दर्शविणारा नकाशा सदर अधिसूचनेसह नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयांमध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

१. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

२. जिल्हाधिकारी, पुणे.

३. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

४. उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

५. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा.

अनुसूची ' अ '

ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि., मांजरी, हौसिंग प्रोजेक्टस् एलएलपी व इतर यांच्या मौजे मांजरी खु. व वाघोली, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मंजूर एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचा तपशील

अ.क्र.	मौजे	सर्व्हे नंबर	हिस्सा नं.	प्रकल्पात नव्याने समाविष्ट करून अधिसूचित करावयाचे क्षेत्र (हे.)
१	२	३	४	५
	अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये वाढ झालेल्या क्षेत्राचा तपशील:-			
१	मांजरी खुर्द	१२६	--	०.४१७१
२	मांजरी खुर्द	१६१	--	०.३२५०
३	वाघोली	१२५५	३४	०.४०००
४	वाघोली	१२५५	३६	०.४०००
५	वाघोली	१२७६	२०	०.४३००
६	वाघोली	१२७६	२१	०.४५००
		एकूण		**२.४२२१ हे.**
दिनांक २० फेब्रुवारी २०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेले क्षेत्र :--				**६७.३६०४ हे.**
या अधिसूचनेद्वारे एकात्मिक नगर वसाहतीचे एकूण सुधारित अधिसूचित केलेले क्षेत्र :--				**६९.७८२५ हे.**

सदरहू अधिसूचना नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या *www.dtp.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

अविनाश भा. पाटील,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १९ जुलै २०२४.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. R.P. Pune/Village Manjari Kh., Wagholi/ITP/TPV-1/3885/2024.— Whereas, the Government in Urban Development Department, *vide* its Notification No. TPS-1895/227/C.R. 26/95/UD-13, dated 25th November 1997 has sanctioned the Regional Plan for the Pune Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") with Development Control Regulation under the provisions of Section 15 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the said Act") which has come into force with effect from 10th February, 1998 ;

and whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* Notification No. TPS/1804/Pune RP D.C.R./UD-13, dated 16th November 2005 and addendum No. TPS-1804/ Pune RP D.C.R./UD-13/Addendum, dated 6th January 2006 has incorporated the regulations for Development of Special Townships by amending the sanctioned Development Control Regulations for the said Regional Plan, under the provisions of sub-section *(4)* of Section 20 of the said Act and it has further amended from time to time ;

and whereas, in exercise of the powers conferred by the provisions of sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Metropolitan Development Authority Act, 2016 the Government *vide* Notification of Urban Development Department No. PRD-3316/CR-54/UD-7, dated 11th July 2016 has established Metropolitan Region Development Authority to be called "the Pune Metropolitan Region Development Authority" (hereinafter referred to as "the said Development Authority") for the Metropolitan Area of Regional Plan more specifically described in the Schedule appended thereto ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* its Government Notification No. TPS-1817/CR-173/17/UD-13, dated-18th January 2018, appointed the said Development Authority as a "Special Planning Authority" under the provisions of Section 40 *(1)* of the said Act ;

and whereas, the Government in Urban Development Department has accorded Locational Clearance for the Special Township Project proposed by L. K. Developers Pvt. Ltd. (hereinafter referred to as "the said Project Proponent") in Village Manjari Kh. and Wagholi, Taluka Haveli, District Pune on lands admeasuring an area of 40.0964 Ha., approximately *vide* Government Notification No. TPS-1807/245/C.R. 641/07/UD-13, dated 4th April 2008 and after Government in Urban Development Department has accorded Locational Clearance for additional lands admeasuring an area of 1.255 ha. of village Manjari Kh. *vide* its Government Addendum No. TPS- 1807/245/C.R. 641/07/UD-13, dated 4th December 2008. Therefore, total area having Locational Clearance is 41.3514 ha. (hereinafter referred to as the "said Notified Special Township Project") ;

and whereas, as per the Central Government's Certificate dated 9th April 2010, the name of L.K. Developers company has been changed as Kul Developers Pvt. Ltd. and thereafter as per the Central Government's Certificate dated 21st May 2018, the name of Kul Developers Pvt. Ltd. has been changed as Ashdan Developers Pvt. Ltd. and accordingly the said area has been transferred to the Applicant Company ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1818/ 1349/CR. 229/18/20 *(4)*/Part-1/UD-13, dated 20th November 2018 sanctioned Development Control Regulations for the Special Planning Authority in order to incorporate the regulations for Development Integrated Townships Project ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* its Government Notification No. TPS-1821/452/CR-105/2022/UD-13, dated 5th March 2024 published the notice under the provisions of Section 37 *(1AA)(a)* and 20 *(3)* of the said Act, to make certain changes in the Regulation No. 14.1 for the Integrated Township Project of the sanctioned Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) and further issued directives under the provisions of Section 154 of the said Act that the above modification shall come into force immediately irrespective of sanction to the said proposed moidifications, and as per footnote of the above notice, for the effective implementation of these proposed modifications will be applicable to the prevailing ITP policy of the respective DCR

of NAINA, CIDCO, MSRDC and PMRDA, the prevailing provisions of ITP policy of respective DCR of NAINA, CIDCO, MSRDC and PMRDA will continue wherein no modifications are proposed (hereinafter referred to as "the said Regulations") ;

and whereas, the said notified Special Township Project area came within Pune Metropolitan Region and the said Development Authority has sanctioned second revised Master Plan of the said notified Integrated Township Project on 21st November 2019 for 40.4497 ha. area with certain conditions as per Regulation No. 6.1 of the said Regulations (hereinafter referred to as the "said Integrated Township Project") ;

and whereas, for the said Integrated Township Project proposed by the said project proponent in village Manjari Kh. and Wagholi, Taluka Haveli, District Pune on lands admeasuring as area of 41.3514 ha. The Director of Town Planning, Maharashtra State, Pune has accorded Locational Clearance for additional land admeasuring 20.1450 Ha. *vide* Notification No. R.P.Pune/village-Manjari Kh., Wagholi/ITP/TPV-1/2986, dated 27th October 2010 and additional land admeasuring 5.864 ha. *vide* Government of Maharashatra in Urban Development Departments Government Notification No. TPS-1821/1661/CR-138/2022/UD-13, dated 20th February 2023. Accordingly, total area having Locational Clearance is 67.3604 ha. (hereinafter referred to as the "said Notified Integrated Township Project") ;

and whereas, the said porject proponent now *vide* its letter deated 26th December 2023, dated 4th January 2024, dated 7th February 2024, dated 12th March 2024 and dated 18th June 2024 submitted a proposal as per the provisions of Regulation No. 4.5 of the said Regulations to the Directorate for the grant of revised Locational Permissions by incorporating new additional land admeasuring area about 2.4221 ha. from S. No. 126 and 161 of village Manjari Khu., Taluka Haveli, District Pune and S. No. 1255/34, 1255/36, 1276/20 and 1276/21 of village Wagholi, Taluka Haveli, Distrct Pune in the area of the Project ;

and whereas, as per the said Regional Plan, the said additional lands are included in "Agriculture and No Development" Zone and affected by 24 mtrs. and 30 mtrs. wide Road ;

and whereas, as per the documents submitted by the said Project Proponent, the Ownership and Development Rights of the said additional lands proposed to be incorporated in the said Project are to be acquired by the said Project Proponent and the said Project Proponent has also submitted an Affidavits to that effect as per Revenue record ;

and whereas, as per the Regulation No. 4.5 of the said Regulation, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune as per the request of said Project Proponent, may grant to add or delete any area, not exceeding 50 per cent of the total area under Locational Clearance ;

and whereas, as per the request of the said Project Proponent, the area of the said additional lands to be added is less than 50 per cent of the 67.3604 ha. area of the said Project, for which Government has given locational clearance.

and whereas, it is accordingly expedient to designate the area of the lands to be incorporated and deleted on the said Regional Plan under the provisions of sub-section *(3)* of Section 18 of the said Act as the additional project area for the said Project ;

and whereas, the said Project Proponent, *vide* challan No. GRNMH004931737202425P, dated 9th July 2024, defacement No. 0002766541202425, dated 12th July 2024 has deposited an amount of Rs. 72,500/- through the Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune which is at the rate of 10 per cent of the total premium charges at the stage of Locational Permission as per the Regulation No. 4.5 of the said regulation for said Project for the said additional lands falling in zones, other than residential and commercial ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under the regulation No. 4.5 of the said Regulation hereby grants permission to add the area 2.4221 ha. more specifically described in "Schedule-A" appended hereto, from the area of said Project for which Locational permission has already been granted, subject to the following terms and conditions ;

Terms & Conditions of the Integrated Township Project.—

(I) Conditions of Ownership.—

(1) It shall be the responsibility of the said Project Proponent to procure the proof of Ownership/ Development Rights of said additional lands along with the area under the said Notified Integrated Township Project. Also while applying for Letter of Intent, it is obligatory on the said Project Proponent to submit to the Collector, Pune, the extracts of original certified documents of the registered Memorandum of Understanding, registered documents of joint venture, original measurement plans, documents proving the ownership rights, development rights etc.

(2) M/s. Wagholi Properties or its partners, Shri. Ashok Dhanraj Chordia and Vimladevi Ranka do not have clear interest in the Applicant companies M/s. Ashdan Developers Pvt. Ltd. and Manjari Housing Projects LLP. The 7/12 extract for S. No. 1255/34 mentions name of Ashok Dhanraj Chordia as partner and on behalf of M/s. Wagholi Properties as an occupier. However, the interest of Vimladevi Ranka in this land is unclear. Therefore, before issuing the Letter of Intent (LOI) for the proposed additional area, the Collector, Pune shall ensure the ownership of the land bearing S. No. 1255/34, and verify the registered agreements or other documents related to the ownership of the Applicant companies.

(3) Area of lands shall be included in the said Notified Integrated Township Project after obtaining measurement plan issued by the Deputy Superintendent of Land Records. If such lands are not remain continuous with the lands under the said Notified Integrated Township Project, then area of land stand automatically deleted from the said Notified Integrated Township Project area and the said Notified Integrated Township Project shall not be implemented on such lands.

(4) Collector, Pune should take appropriate action regarding land holding titles like "भोगवटा वर्ग-२" "सरकार" "New Tenure" lands and Surplus lands declared under Urban Land Ceiling Act, area of schemes under Section 20 of the Urban Land Ceiling Act etc. which are included in the said Notified Integrated Township Project before issuing the letter of intent.

(5) Collector, Pune shall verify and take appropriate action in respect of lands which are included in the said Notified Integrated Township Project having entries regarding bank encumbrances and names in the Other Right's column of 7/12 extract, before issuing the letter of intent.

(6) If any document of ownership of lands included in the area of the said Notified Integrated Township Project is found false in future or if any judicial proceedings arise regarding the said Notified Integrated Township Project in future, then it shall be the sole responsibility of the said Project Proponent to deal with those proceedings at his own risk and cost. In such case Locational Clearance shall be deemed to be cancelled automatically for those lands.

(II) Conditions regarding Environment and Others.—

(1) The said Project Proponent shall obtain the Environmental Clearance from the Ministry of Environment, Forest and Climatic Change (MoEF and CC) and from the Appropriate Competent Authority before obtaining the Building Permission within the lands to be incorporated in the area of the said Notified Integrated Township Project. Also the terms and conditions of the notifications issued by the Ministry of Environment, Forest and Climate Changes for the Environment Impact Assessment Act, 1986 from time to time shall be binding on the said Project Proponent.

(2) The said Project Proponent shall be responsible for making provision for safe disposal of Solid Waste and effluents within the said Notified Integrated Township Project at his own risk and their own cost, as per the criteria and norms decided by the Maharashtra Pollution Control Board and also subject to the provisions and rules under the relevant Act, in this regard.

(3) For the said additional lands, to be included in the project it shall be mandatory to submit the no-objection certificate of Irrigation Department to the collector before getting the Letter of Intent for the Project.

The terms and conditions imposed by the Irrigation Department and other concerned department of the State Government from time to time shall be binding on the said Project Proponent.

The existing nallas / water sourses, etc., in the area of the said Notified Integrated Township Project shall not be closed.

In respect of lands to be included in the said project, a certificate/ no-objection certificate of Irrigation Department about cast of restoration as required should be obtained by the Collector before getting the Letter of Intent for the Project.

(4) Project proponent has submitted the letter of Additional Tahasildar, Loni Kalbhor, Tahasil Haveli regarding the lands to be included in the project are not Tribal Lands. In this letter the outword number and date are not mentioned. Therefore, it will be necessary to the Collector to verify the authenticity of the said letter before issuing the Letter of Intent for the project.

(5) It shall be binding on the said Project Proponent to provide water supply for the development of the said Notified Integrated Township Project as per the provisions of Regulation No. 10.5 *(a)* of the said Regulations at their own cost and responsibility. The conditions prescribed by Irrigation Department in these regards, from time to time are binding on the said Project Proponent.

(6) It shall be binding on the said Project Proponent to provide electricity supply for the development of the said Notified Integrated Township Project as per the Regulation No. 10.5 *(c)* of the said Regulation at their own cost and responsibility. Also the said Authority, shall obtain from the Project Proponent, necessary permissions and also the firm commitment of electricity supply for the entire area of the said Notified Integrated Township Project from the concerned power supply company before the approval of the Master Plan as per the provisions of Regulation No. 6.5 of the said Regulation.

(7) The said project proponent shall submit certificate regarding the lands of Maharashtra Industrial Development Corporation are not included in Integrated Township.

(III) Regarding Development.—

(1) The said Project Proponent shall provide access road of required width as per said Regulation but minimum 9 mtrs. free of cost to the lands owned by other private persons, which are surrounded by the area under the said Notified Integrated Township Project.

(2) It is binding on the said Project Proponent to protect the easement rights of the existing public roads passing through the area of the said Notified Integrated Township Project.

(3) It shall be binding on said Project Proponent to construct CD work on Nalla included in the area of the said Notified Integrated Township Project with the permission of concern department and to keep distance from River, Nallas, Canal, Lake and other Water bodies within the area of the said Notified Integrated Township Project required as per the said Regulation for Development of Integrated Township Project.

(4) No construction of any type shall be allowed on the lands having slope equal to or more than 1:5 in the said project, whether such lands are specifically marked as such on the Development Plan or not. Also No development activity shall be permissible and no development involving cutting/ leveling/ filling etc. shall be allowed on such lands.

(5) The said Project Proponent shall have to plan and earmark the lands at suitable location within the area of the said Notified Integrated Township Project for public purpose reservations and also for basic infrastructure required for the population to be accommodated within the said Project, as per the said Regulation and shall plan and develop the same at his own cost.

(6) It shall be binding on the said Project Proponent to provide the System of Rain Water Harvesting in each building of the said Notified Integrated Township Project.

(7) It shall be binding on the said Project Proponent to provide the System of Waste-Water Recycling in each building of the said Notified Integrated Township Project for reuse of the used water.

(8) It shall be binding on the said Project Proponent to provide and operate Solar Energy System within the said Notified Integrated Township Project.

(IV) Other Terms and Conditions.—

(1) The terms and conditions mentioned with reference to the Locational Clearence, amalgamation and the said additional area *vide* notifications dated 4th April 2008, dated 4th Decmber 2008,dated 20th February 2023 issued by the Government in Urban Development Department and notification dated 27th October 2020 issued by Directorate of Town Planning shall be applicable for the said Notified Integrated Township Project.

(2) In case of breach of any of the terms and conditions by the said Project Proponent the powers / rights of cancellation of the Locational Clearance granted *vide* this Notification are reserved with Government. If locational clearance stands cancelled due to non-compliance or non fulfillment of above stated conditions then, the premium or any other amount paid by the Applicant to the Government shall not be refunded to the said project proponent.

(3) The Development Control Rules, sanctioned by the Government on 20th November 2018 for the said Integrated Township shall continue to be applicable subject to modification thereof from time to time.

(4) The provisions mentioned in Regulation No. 7.5 of the said Regulation regarding the share of Local/Planning Authority shall be applicable for the said Notified Integrated Township Project.

(5) This Notification shall come into force on the date of its publication in the Maharashtra Government Gazette.

(6) The details of the said additional lands incorporated within the said Notified Integrated Township Project are given in "Schedule-A" appended hereto. Also the plan showing the boundaries of the said Notified Integrated Township Project including the said additional lands is given in "Schedule-B" appended hereto.

(7) It is binding on the said Project Proponent to provide and Develop the Development Plan Roads, reservations and proposals provided in the Draft / Final Development Plan of PMRDA and these shall be made available to the common public.

The details of the said additional lands incorporated within the said Notified Integrated Township Project and the plan showing the boundaries along with this Notification shall be made available for the inspection of the general public during office hours on all working days at the following offices.–

1. Metropolitan Commissioner, Pune Metropolitan Region Development Authority, Pune.
2. The Collector, Pune.
3. Joint Director of Town Planning, Pune Division, Pune.
4. Deputy Director of Town Planning, Urban Research Cell, Pune.
5. Assistant Director of Town Planning, Pune Branch

Schedule 'A'

Details of Lands included in Integrated Township Project of Ashdan Developers Pvt. Ltd., Manjari Housing Projects LLP and others, Manjari kh. and Wagholi, Taluka Haveli, District Pune.

Sr. No.	Mouje No.	Survey No.	Hissa No.	Details of land area to be included in earlier notified area (Ha.)
1	2	3	4	5
1	Manjari kh.	126	--	0.4171
1	Manjari Kh.	161	--	0.3250
3	Wagholi	1255	34	0.4000
4	Wagholi	1255	36	0.4000
5	Wagholi	1276	20	0.4300
6	Wagholi	1276	21	0.4500
		Total		**2.4221**

Area Notified By Notification Dated 20th February 2023 :-- 67.3604 Ha.

Total Revised Notified Area of Township :-- 69.7825 Ha.

This notification shall also be published on the website of Directorate of Town Planning and Valuation *www.dtp.maharashtra.gov.in*

AVINASH B. PATIL,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 19th July 2024.

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा सोलापूर

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये.

अधिसूचना

क्रमांक भू.सं./कार्या-१/आरआर-२२३१/२०२४.— ज्याअर्थी, कुर्डुवाडी नगरपरिषदेची विकास योजना (पहिली सुधारित) (यापुढे "उक्त विकास योजना/सुधारित विकास योजना म्हणून संबोधिलेली") शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/१६०/सीआर-४३/२०१२/पुनर्बांधणी/वियो/मंजुरी/नवि-१३, दिनांक २८ मार्च २०१३, अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोटकलम *(१)* अन्वये (यापुढे "उक्त महाराष्ट्र अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दिनांक २७ सप्टेंबर २०१३ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमीन (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधलेली) उक्त सुधारित विकास योजनेत आरक्षण क्रमांक ५७, खेळाचे मैदान या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधित होत आहे (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रस्ताव" म्हणून संबोधलेला) ;

आणि ज्याअर्थी, कुर्डुवाडी नगरपालिकेने (यापुढे "उक्त नगरपालिका" म्हणून संबोधलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(१)(C)* अन्वये उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम *(१)* खाली काढलेल्या अधिसूचना क्रमांक टीपीएस/२१७५/५१०६/युडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(१) (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी सोलापूर, यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त नगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(२)* मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या नियम ५ *(दोन्ही)* नुसार उक्त अधिनियमातंर्गत मंजूर विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त संपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्ही सह) ला सूट दिली आहे. सदरचा अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण क्रमांक ७१, दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे आणि म्हणून उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्कता आहे असे सरळ याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ ऑगस्ट २०१४ च्या अधिसूचनेद्वारे केलेले भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ च्या नियम क्रमांक १७ नुसार या संपादन प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचीनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत ;

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(४)* सह उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर असे घोषित करतात की, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिकाऱ्यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ खंड *(ग)* अन्वये याव्दारे भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू करावी असे निदेश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे गट नंबर, संपादनाचे क्षेत्र, जमिनीचे नकाशे इत्यादी कागदपत्रे भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर, डॉ. कोटणीस हॉल, पहिला मजला, शुभराय आर्ट गॅलरीजवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (जुना पार्क चौक), सोलापूर-४१३००१ यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत.

अनुसूची

कुर्डुवाडी नगरपालिका

जिल्हा सोलापूर, तालुका माढा, गाव कुर्डुवाडी

अ. क्र.	संपादन करावयाच्या जागेचे		
	गट क्रमांक	क्षेत्र (चौ.मी.)	संपादनाचे प्रयोजन
१	२	३	४
१	५०/२ पै.	९००.००	कुर्डूवाडी शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील
२	५०/१ पै.	१५२००.००	आरक्षण क्रमांक ५७-खेळाचे मैदान.

कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सोलापूर.

सोलापूर, १८ जुलै २०२४.

जिल्हा सोलापूर

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये.

अधिसूचना

क्रमांक भू.सं./कार्या-१/आरआर-१९९७/२०२४.— ज्याअर्थी, कुर्डुवाडी नगरपरिषदेची विकास योजना (पहिली सुधारित) (यापुढे "उक्त विकास योजना/सुधारित विकास योजना म्हणून संबोधिलेली") शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/१६०/सीआर-४३/२०१२/पुनर्बांधणी/वियो/मंजुरी/नवि-१३, दिनांक २८ मार्च २०१३, अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोटकलम *(१)* अन्वये (यापुढे "उक्त महाराष्ट्र अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दिनांक २७ सप्टेंबर २०१३ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमीन (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधलेली) उक्त सुधारित विकास योजनेत आरक्षण क्रमांक ५८, लिंगायत स्मशानभूमी या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधित होत आहे (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रस्ताव" म्हणून संबोधलेला) ;

आणि ज्याअर्थी, कुर्डुवाडी नगरपालिकेने (यापुढे "उक्त नगरपालिका" म्हणून संबोधलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(१)(C)* अन्वये उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम *(१)* खाली काढलेल्या अधिसूचना क्रमांक टीपीएस/२१७५/५१०६/युडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(१) (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी सोलापूर, यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त नगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(२)* मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या नियम ५ *(दोन्ही)* नुसार उक्त अधिनियमातंर्गत मंजूर विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त संपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्ही सह) ला सूट दिली आहे. सदरचा अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण क्रमांक ७१, दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे आणि म्हणून उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्कता आहे असे सरळ याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक २७ ऑगस्ट २०१४ च्या अधिसूचनेद्वारे केलेले भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ च्या नियम क्रमांक १७ नुसार या संपादन प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचीनुसार पुर्नवसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत ;

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम *(४)* सह उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर असे घोषित करतात की, उकत जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिकाऱ्यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ खंड *(ग)* अन्वये याव्दारे भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू करावी असे निदेश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे गट, संपादनाचे क्षेत्र, जमिनीचे नकाशे इत्यादी कागदपत्रे भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर, डॉ. कोटणीस हॉल, पहिला मजला, शुभराय आर्ट गॅलरीजवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (जुना पार्क चौक), सोलापूर-४१३ ००१ यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत.

अनुसूची

कुर्डुवाडी नगरपालिका

जिल्हा सोलापूर, तालुका माढा, गाव कुर्डूवाडी

अ. क्र.	संपादन करावयाच्या जागेचे गट क्रमांक	क्षेत्र (चौ.मी.)	संपादनाचे प्रयोजन
१	२	३	४
१	२७९, २८०, २८१, २८२	४३००.००	कुर्डुवाडी शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ५८, लिंगायत स्मशान भूमी.

कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सोलापूर.

सोलापूर, २० जून २०२४.

जिल्हाधिकारी यांजकडून

अंतिम अधिसूचना

क्रमांक महसूल शाखा//कार्या-३/दरखास्त गावठाण/आरआर-६१७/२०२४.— ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग, क्रमांक टीएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक १ जुलै १९७६, अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) च्या कलम ४ पोटकलम *(१)* च्या परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. त्याचा वापर करून उक्त अधिनियमाचे कलम ४ पोटकलम *(४)* द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे इकडील कार्यालयाकडील पत्र क्रमांक २०२३/महसूल शाखा/कार्या-३/दरखास्त गावठाण/आरआर ६४६, दिनांक ११ सप्टेंबर २०२३ अन्वये प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केलेप्रमाणे मी, कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर याद्वारे दिनांक / /२०२४ पासून सोलापूर जिल्ह्याच्या मंगळवेढा तालुक्यातून श्री संत कान्होपात्रानगर या गावास स्वतंत्र महसुली गावाचा दर्जा देणेबाबत सोबतच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या हद्दी असलेल्या व सोलापूर जिल्ह्याच्या मंगळवेढा तालुक्यातून नवीन निर्माण झालेल्या श्री संत कान्होपात्रानगर या नावाने ओळखण्यात येणाऱ्या गावास महसुली गाव म्हणून जाहीर करीत आहे.

अनुसूची

जिल्हा सोलापूर, तालुका मंगळवेढा

गावाचे नाव	मूळ गट नंबर/सर्व्हे नंबर
१	२
मंगळवेढा	
श्री संत कान्होपात्रानगर	४६ ते ५२, ५५, ९०, ९६, ९९ ते १०२, १०७ ते १०८, १२६ ते १३५, १७० ते १७५, १७८, १८६, १८९, १९४ ते २०६, २२८ ते २२९, २३३ ते २३८, २४५ ते २४६, २४८, २५० ते २५४, २५८ ते २२२२, २२२४ ते २४९५, २४९९, २५८५ ते २५९४, २५९८ ते २६०१, २९४९, ३१२१ ते ३१२४, ३१२६, ३५५७, ४४३३ ते ४४५०, एकूण गट २३४०.

टीप.-- नवीन उर्वरित गावातील लोकांचा, अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर जाणे-येणेचा हक्क राहील, तसेच नवीन गावातील लोकांचा उर्वरित गावातील स्मशानभूमी, खळे आणि गुरेचरण यासाठी नेमून दिलेल्या जमिनीवर हक्क राहील.

परिशिष्ट-अ

अ.क्र.	तपशील	मूळ गाव	नवीन निर्माण होणारे गाव	मूळ गावात राहणारे
१	२	३	४	५
१	कुटुंबाची संख्या	६५०२	४४६	६०५६
२	लोकसंख्या	२३१६१	१३३७	२१८२४
३	एकूण गट	२३८१	२३४०	४१
४	क्षेत्र	६६६४.३३ (हे. आर)	६५८६.०६ (हे. आर)	७८.२७ (हे. आर)
५	आकार	२३१२६.८४ (रु. पै.)	२३०२३.७३ (रु. पै.)	१०३.११ (रु. पै.)
६	लागणीलायक क्षेत्र	६४६८.९३ (हे. आर)	६४२९.२३ (हे. आर)	३९.७० (हे. आर)

परिशिष्ट-अ--*चालू*

अ.क्र.	तपशील	मूळ गाव	नवीन निर्माण होणारे गाव	मूळ गावात राहणारे
१	२	३	४	५
७	लागवडीस अयोग्य क्षेत्र	१९५.४ (हे. आर)	१५६.८३ (हे. आर)	३८.५७ (हे. आर)
८	गायरान क्षेत्र	२५.४३ (हे. आर)	९.४९ (हे. आर)	१५.९४ (हे. आर)
९	वन	१५.५८ (हे. आर)	१५.५८ (हे. आर)	०
१०	गावठाण	२००.०९२५ (हे. आर)	०	२००.०९२५ (हे. आर)
११	स्मशानभूमी	७.६२ (हे. आर)	१.४७ (हे. आर)	६.१५ (हे. आर)
१२	रस्ते	९९.२२२५ (हे. आर)	आहे	आहे
१३	शाळा	आहे	आहे	आहे
१४	सार्वजनिक दवाखाने	आहे	नाही	आहे
१५	पिण्याचे पाणीपुरवठा	आहे	आहे	आहे
१६	नगरपालिका/ग्रामपंचायत	आहे	प्रस्तावित	आहे

कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सोलापूर.

सोलापूर, २६ जुलै २०२४.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांजकडून

अधिसूचना

क्रमांक कार्या-७/गृह परिक्षेत्र/आरआर-१७००/२०२४.— ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी माझे निदर्शनास आणून दिले आहे की, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २८ जुलै २०२४ रोजी मा. महामहीम राष्ट्रपती सो., भारत यांचा कोल्हापूर जिल्हा दौरा असून मा. यांचा कोल्हापूर विमानतळ ते श्री अंबाबाई दर्शन ते सर्किट हाऊस ते ताराराणी चौक ते तावडे हॉटेल ते वारणानगर कोडोली ते परत कोल्हापूर विमानतळ असा दौरा मार्ग असणार आहे. तसेच इतर अनेक राजकीय नेते उपस्थित असणार आहेत. त्यामुळे कोल्हापूर विमानतळ ते श्री अंबाबाई दर्शन ते सर्किट हाऊस ते ताराराणी चौक ते तावडे हॉटेल ते वारणानगर कोडोली ते परत कोल्हापूर विमानतळ या दरम्यानचे मार्गावर मोटार वाहनांची वाहतूक सुरळीत ठेवण्याकरिता व नागरिक, पादचारी यांना सुरक्षितता प्रस्थापित व्हावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. याकरिता वनवे मार्ग शिथिल करणे, आवश्यकतेनुसार वाहतूक सुरू-बंद करणे अगर वळविणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी अमोल येडगे, जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम ३३ *(१)* क अन्वये रहदारी विनियमचे असलेल्या अधिकारान्वये खालील नमूद निर्देश व आदेश जारी करीत आहे.

वनवे मार्गात शिथिलता.--

खालील वनवे मार्ग हे मा. महामहीम राष्ट्रपती यांचा कॉनव्हॉय ये-जा करणेच्या कालावधीकरिता व्ही.व्ही.आय.पी. यांचा कॉन्व्हॉय आणि बंदोबस्तातील शासकीय वाहने यांच्याकरिता शिथिल करण्यात येत आहेत.

१. दुर्गा सिग्नल चौक ते खाँसाब पुतळा चौक

२. खरी कॉर्नर ते मिरजकर तिकटी

३. बिनखांबी ते खरी कॉर्नर

४. मिरजकर तिकटी ते बिनखांबी गणेश मंदिर

वळविण्यात आलेले मार्ग.--

१. बोरपाडळे हॉटेल येथून कोडोली/वारणाच्या दिशेने येणारी सर्व प्रकारची वाहतूक कोल्हापूरच्या दिशेने वळविण्यात येईल.

२. शहापूर माले फाटा येथून वारणाच्या दिशेने जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही माले गावाकडे किंवा युटर्न घेऊन बोरपाडळेकडे वळविण्यात येईल.

३. कोडोली पोलीस ठाणे समोरील पोखले फाटा येथे वारणाच्या दिशेने कोणत्याही प्रकारची वाहतूक सोडली जाणार नाही त्यांना पोखले गावाकडे वळविले जाईल किंवा युटर्न घेऊन बोरपाडळेकडे वळविण्यात येईल.

४. प्लामाक फाटा कोडोली येथून एकही वाहन वारणा कोडोलीच्या दिशेने सोडले जाणार नाही.

५. वारणा तालीम येथील बॅरीकेटिंगपासून एकही वाहन पुढे सोडले जाणार नाही.

६. माले गावातून कोडोलीच्या दिशेने एकही वाहन सोडले जाणार नाही.

७. दानेवाडी फाटा येथून कोडोलीच्या दिशेने एकही वाहन सोडले जाणार नाही.

८. म्हसोबा देवालय येथून कोडोलीच्या दिशेने एकही वाहन सोडले जाणार नाही.

बंद करण्यात येणारा महामार्ग.--

१. महामहीम राष्ट्रपती महोदय यांचा कॉनव्हॉय विमानतळ येथून महालक्ष्मीकडे रवाना होताना एचएसपी ऑफीससमोर पुणेच्या दिशेने जाणारी आणि अथायु हॉस्पिटलच्या समोर कागलच्या दिशेने जाणारी पुणे बेंगलोर एनएच-४ महामार्गाची वाहतूक काही काळ थांबविण्यात येईल.

२. महामहीम राष्ट्रपती महोदय यांचा कॉनव्हॉय सर्किट हाऊस येथून तावडे हॉटेल मार्गे वाठार ब्रिज येथून वारणा नगरकरिता रवाना होताना लक्ष्मी टेकडी, एचएसपी ऑफिस, हॉटेल स्टायलँड, उंचगाव रेल्वचे ब्रिज येथे काही काळ पुणे-बेंगलोर एनएच-४ महामार्गाची पुणेच्या दिशेने जाणारी वाहतूक काही काळ थांबविण्यात येईल, तसेच पुणे बेंगलोर एनएच-४ महामार्गावरील कागलकडे जाणारी वाहतूक ही किणी टोल नाका, शेर-ए- पंजाब धाबा समोर काहीकाळ अडविली जाईल.

३. महामहीम राष्ट्रपती महोदय यांचा कॉनव्हॉय वारणानगर वाठार ब्रिज मार्गे विमानतळकडे जाताना पुणे-बेंगलोर एनएच-४ हायवेवरील कागलच्या दिशेने जाणारी वाहतूक किणी टोलनाका, शेर-ए-पंजाब धाबा, नागाव फाटा, सांगली फाटा ओव्हर ब्रिज, पंचगंगा ब्रिज येथे काहीकाळ थांबविण्यात येईल. तसेच पुणे बेंगलोर एनएच-४ महामार्गावरील पुणे कडे जाणारी वाहतूक ही लक्ष्मी टेकडी, एचएसपी ऑफिससमोर काहीकाळ अडविली जाईल.

४. महामहीम राष्ट्रपती महोदय यांचा कॉनव्हॉय वारणानगरकडे जाताना आणि वारणा नगरकडून विमानतळकडे येताना या दरम्यान पुणे बेंगलोर, एनएच-४ हायवेवर असणाऱ्या सर्व वाहनांनी महामार्गाचा वापर न करता पर्यायी मार्गाचा वापर करावा. या वाहनांना महामार्गावरून पर्यायी मार्गाकडे वळविण्यात येईल.

वारणानगर येथील कार्यक्रमाकरिता येणाऱ्या नागरिकांकरिता पार्किंगची सोय.--

वारणानगर येथे होणाऱ्या कार्यक्रमाकरिता वारणा साखर कारखाना गाडी अड्डा येथे पार्किंगची सोय करण्यात आली आहे. या पार्किंगकरिता येणारी वाहने दिनांक २८ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. पूर्वीच येतील. १०.०० वा. नंतर वाठार ते वारणानगर आणि कोडोली ते वारणानगर हा रस्ता वाहतुकीसाठी बंद राहील. कोडोलीकडून कार्यक्रमाकरिता येणारी वाहने श्रीराम मंदिर, भारत गॅसकडून गाडी अड्ड्याकडे पार्किंगकरिता येतील. वारणा तालीम समोरील बॅरीकेटिंगपासून कोणतेही वाहन पुढे येणार नाही.

इतर.--

महामहीम राष्ट्रपती महोदयांचा कॉनव्हॉय विमानतळ ते श्री महालक्ष्मी मंदिर ते सर्किट हाऊस ते वारणानगर ते विमानतळ या दरम्यान येताना आणि जाताना संपूर्ण कॉनव्हॉय मार्गावर मा. महोदयांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यकतेनुसार वाहतूक चालू बंद करण्यात येईल.

नो-पार्किंग झोन.--

महामहीम राष्ट्रपती महोदयांचा व्हीव्हीआयपी दौरा सुरू होऊन संपेपर्यंत खालील मार्गांवर कोणतेही वाहन पार्क करण्यास मनाई आहे. सदरचा संपूर्ण रस्ता नमूद कालावधीकरता नो-पार्किंग झोन म्हणून जाहीर करत आहोत.

१. विमानतळ ते शाहू टोल नाका.

२. शाहू टोल नाका ते केएसबीपी चौक ते ताराराणी चौक (रस्त्याच्या दोन्ही लेन).

३. ताराराणी चौक ते धैर्यप्रसाद चौक (रस्त्याच्या दोन्ही लेन).

४. धैर्यप्रसाद चौक ते मा. जिल्हाधिकारी कार्यालय चौक (रस्त्याच्या दोन्ही लेन).

५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते दसरा चौक ते बिंदू चौक.

६. बिंदू चौक ते मिरजकर तिकटी ते खरी कॉर्नर ते श्री महालक्ष्मी मंदिर.

७. धैर्यप्रसाद चौक ते सर्किट हाऊस.

८. ताराराणी चौक ते तावडे हॉटेल.

वरील निर्देश हे दिनांक २८ जुलै २०२४ रोजी व्हीव्हीआयपी दौरा सुरू होऊन संपेपर्यंत फक्त कॉनव्हॉयमधील वाहनाकरिता ये-जा करणेच्या कालावधीत एकेरी मार्ग शिथिल करण्यात येत आहे. याशिवाय आवश्यकतेनुसार महामार्गावरील वाहतूक तसेच कोल्हापूर शहरातील इतर रस्ते, चौक याठिकाणची वाहतूक सुरू-बंद करणे अगर वाहतूक वळविणेत येत आहे.

सदरची अधिसूचना आज रोजी दिनांक २६ जुलै २०२४ माझ्या सही व शिक्यानिशी जारी करण्यात येत आहे.

अमोल येडगे,
जिल्हाधिकारी तथा जिल्हांदडाधिकारी,
कोल्हापूर.

कोल्हापूर, २६ जुलै २०२४.

उपसंचालक, भूमी अभिलेख यांजकडून

मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७

अधिसूचना

मौजे हारूर, तालुका कोल्हापूर, जिल्हा कोल्हापूर येथील जमीन एकत्रीकरण योजना

क्रमांक एकक २५७ (कोल्हापूर)/एसआर-१९/(आजरा)/२३७४९९३/२०२३-२४.—मौजे हारूर, तालुका कोल्हापूर, जिल्हा कोल्हापूर येथील जमीन एकत्रीकरण योजना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक पुरवणी पान ६७३ वर दिनांक २२ फेब्रुवारी १९७३ रोजी योजना कायम करण्यात आलेबाबतची आधेसूचना प्रसिद्ध झालेली होती. सदर मंजूर एकत्रीकरण योजनेतील गट नंबर २४५ ते २४८ चे योजनेमध्ये व गट नकाशामध्ये दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देऊन तो क़ायदा कलम ३२ *(१)* अन्वये या कार्यालयाकडील दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध करणेत आला होता. सदर मसुदा प्रसिद्ध केले बाबत गाव कामगार तलाठी, हारूर यांचा दिनांक १३ मार्च २०२४ व तहसीलदार, आजरा यांचा दिनांक १४ मार्च २०२४ चा अहवाल प्रकरणी सामील आहे. प्रस्तुत प्रकरणी मसुदा प्रसिद्धीअंती या कार्यालयास तसेच जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर व उपअधीक्षक भूमी अभिलेख, आजरा यांचे कार्यालयास कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही सदर दुरुस्ती योजना मसुदा प्रसिद्धीअंती विनाहरकत आहे.

सबब मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ३२ पोटकलम *(३)* मधील तरतुदीनुसार उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे हे मंजूर योजनेतील गट नंबर २४५ ते २४८ चे गट नकाशा व योजना दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव कायम करीत आहेत.

अनिल माने,
उपसंचालक, भूमी अभिलेख,
पुणे, १२ जुलै २०२४. पुणे प्रदेश, पुणे.

मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७

अधिसूचना

मौजे वासुंबे, तालुका तासगाव, जिल्हा सांगली येथील जमीन एकत्रीकरण योजना

क्रमांक कॉन. एसआर-८०/(सांगली)/एसआर-१०६/(तासगाव)/२३६६२८६/२०२३-२४.—मौजे वासुंबे, तालुका तासगाव, जिल्हा सांगली येथील जमीन एकत्रीकरण योजना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक पुरवणी पान २४८ वर दिनांक ४ फेब्रुवारी १९६५ रोजी योजना कायम करण्यात आलेबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झालेली होती. सदर मंजूर एकत्रीकरण योजनेतील गट नंबर ३२२, ३२३, ३२४ चे योजनेमध्ये व गट नकाशामध्ये दुरुस्ती करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देऊन तो कायदा कलम ३२ *(१)* अन्वये या कार्यालयाकडील दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करणेत आला होता. सदर मसुदा प्रसिद्ध केलेबाबत गाव कामगार तलाठी, वासुंबे यांचा दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ व तहसीलदार, तासगाव यांचा दिनांक ३१ मे २०२४ चा अहवाल प्रकरणी सामील आहे. प्रस्तुत प्रकरणी मसुदा प्रसिद्धीअंती या कार्यालयास तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, सांगली व उप अधीक्षक भूमी अभिलेख, तासगाव यांचे कार्यालयास कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही सदर दुरुस्ती योजना मसुदा प्रसिद्धीअंती विनाहरकत आहे.

सबब मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ३२ पोटकलम *(३)* मधील तरतुदीनुसार उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे हे मंजूर योजनेतील गट नंबर ३२२, ३२३, ३२४ चे गट नकाशा व योजना दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव कायम करीत आहेत.

अनिल माने,
उपसंचालक, भूमी अभिलेख,
पुणे, १२ जुलै २०२४. पुणे प्रदेश, पुणे.

मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७

अधिसूचना

मौजे धुळदेव, तालुका माण, जिल्हा सातारा येथील एकत्रीकरण करण्याबाबत योजनेतील फेरफारांचा मसुदा

क्रमांक एकक २४९ (सातारा)/एसआर-२१९/(माण)/२३६६५३८/२०२३-२४.—मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम १९४७ चे कलम २० *(१)* अन्वये, मौजे धुळदेव, तालुका माण, जिल्हा सातारा येथील जमीन एकत्रीकरण योजना कायम करणेबाबतची अधिसूचना दिनांक २ जुलै १९७२ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक पुरवणी पान ६४५ वर प्रसिद्ध झाली होती. सदरच्या मंजूर दुरुस्ती योजनेत बदल करणे आवश्यक असल्याची खात्री झाल्यामुळे मंजुर एकत्रीकरण योजनेतील मौजे धुळदेव, तालुका माण, जिल्हा सातारा येथील गट नंबर २४८, २४९ व ३३६ चा गट नकाशा दुरुस्ती प्रस्तावाच्या मसुद्यास उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी मान्यता देऊन तो कायदा कलम ३२ *(१)* अन्वये प्रसिद्धीसाठी जिल्हा अधीक्षक ,भूमी अभिलेख, सातारा यांचे कार्यालयाकडे दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी पाठविला होता. तो त्यांचेकडून पुढील नियमानुसार कार्यवाहीसाठी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माण यांचेकडे पाठविणेत आला, तो त्यांचेकडून दिनांक १२ डिसेंबर २०२३ रोजी तहसीलदार, माण व गावकामगार तलाठी, धुळदेव, तालुका माण यांचेकडे पाठविणेत आला होता. सदर मसुदा तहसीलदार, माण व गावकामगार तलाठी, धुळदेव यांनी गावी व तहसीलदार कार्यालयाचे नोटिस बोर्डावर प्रसिद्ध केलेला होता. सदरच्या प्रसिद्ध केलेल्या दुरुस्ती योजना मसुद्यावर (१) श्री. सदाशिव तातु सरतापे व इतर ८, (२) श्री. सय्याप्पा हिराप्पा सरतापे तर्फे ॲड. युजवेंद्र सिंग, (३) भगवान यशवंत बनसोडे मयत तर्फे वारस प्रवीण भगवान बनसोडे, (४) श्री. नारायण सीताराम शिंगाडे यांनी हरकत अर्ज दिलेने सदर हरकतीवर या कार्यालयाकडून सर्वसंबंधितांना रितसर नोटिशीने कळवून दिनांक २० मे २०२४, दिनांक ६ जून २०२४, दिनांक १८ जून २०२४, दिनांक २९ एप्रिल २०२४ दिनांक ६ मे २०२४ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १२ जुलै २०२४ रोजी निर्णय पारित केलेला आहे.

सबब मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ३२ पोटकलम *(३अ)* मधील तरतुदीनुसार उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे हे मंजूर योजनेतील गट नंबर २४८, २४९ व ३३६ चे गटाचे दुरुस्ती योजना बाबतचा प्रस्ताव कायम करीत आहेत.

अनिल माने,
उपसंचालक, भूमी अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे.

पुणे, १८ जुलै २०२४.

मुख्याधिकारी यांजकडून

वैराग नगरपंचायत, वैराग

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) *अन्वये वैराग शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण*

सूचना

क्रमांक वैराग न.पं./१५९९/२०२४.— ज्याअर्थी, वैराग नगरपंचायतीने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली), चे कलम २१ *(२)* चे अनुषंगाने कलम २३ *(१)* मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, वैराग (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्रमांक ४८ दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये ऑगस्ट ३ - ९, २०२३ रोजी प्रसिद्ध केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून वैराग नगरपंचायतीने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना/नगर रचनाकार, सोलापूर शाखा, सोलापूर यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून आदेश जावक क्रमांक न.पं. ४४८/२०२३, दिनांक ११ सप्टेंबर २०२३ अन्वये नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना/नगर रचनाकार, सोलापूर, शाखा सोलापूर यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरित केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्रमांक ४२, दिनांक २३ जुलै २०२४ रोजी पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, वैराग नगरपंचायत वैराग.

२. सहायक संचालक, नगर रचना, नगर रचनाकार, सोलापूर शाखा सोलापूर.

उक्त प्रारूप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, वैराग नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून वैराग नगरपंचायतीच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

विद्या पाटील,
मुख्याधिकारी,
वैराग नगरपंचायत, वैराग.

वैराग, २४ जुलै २०२४.

BY CHIEF OFFICER

Vairag Nagarpanchayat, Vairag

Publication of Draft Development Plan of Vairag, under Section 26 (1) *of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

NOTICE

No. Vairag N. P./1599/2024.—Whereas, the Vairag Nagarpanchayat, (hereinafter referred to as "the said Planning Authority,") *vide* Resolution No. 48, dated 11th October 2022 had declared it's intention to prepare a Draft Development Plan of Vairag (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under it's jurisdiction, (hereinafter referred to as the said "Area") as per the provision of Section 23 *(1)* read with Section 21 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette, Part-I-Pune Divisional Supplement, August on 3 - 9 2023 ;

and whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Municipal Council/ Nagarpanchayat *vide* Order No. 448 dated 11th September 2023 has appointed Assistant Director, Town Planning, Town Planner, Solapur Branch, Solapur as "Town Planning officer" to prepare the said Draft Development Plan for the said area ;

and whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning/Town Planner, Solapur Branch, Solapur after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on 16th July 2024 for publication under Section 26 *(1)* of the said Act ;

and whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 42, dated 23rd July 2024 to publish the said Draft Development Plan under Section 26 *(1)* of the said Act, for inviting suggestions/ objections from the public.

Therefore, Vairag Nagarpanchayat hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under Section 26 *(1)* of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. The Chief Officer, Vairag Nagarpanchayat, Vairag.

2. Assistant Director, Town Planning/Town Planner, Solapur Branch, Soalpur.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief officer, Vairag Municipal Council/Nagarpanchayat, within the period of 30 days from the date of publication of the Notice in Maharashtra Government Gazette. Suggestions/objections received by the Municipal Council/Nagarpanchayat within the period of the 30 days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Vairag Nagarpanchayat.

VIDYA PATIL,
Chief Officer.
Vairag Nagarpanchayat, Vairag.

Vairag, 24th July 2024.

नगराध्यक्षा यांजकडून

कवठेमहांकाळ नगरपंचायत, कवठेमहांकाळ

कवठेमहांकाळ शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल / बदलांच्या सूचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिद्धीकरण.

सूचना

क्रमांक कवठेमहांकाळ न.पं./बांधकाम/वि.आ./३२२/२०२४.— ज्याअर्थी, कवठेमहांकाळ नगरपंचायतीने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, चे कलम २६ *(१)* नुसार प्रारूप विकास योजना, क्रमांक २९९९/२०२२, दिनांक २८ नोव्हेंबर २०२२ चे सूचनेद्वारे नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात, पुणे विभागीय पुरवणी भाग एकमध्ये दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहित मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(४)* नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी सादर केला ;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने, तो अंशत: मान्य करून, उक्त योजनेत फेरबदल/बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी विषेश सभा ठराव क्रमांक १ दिनांक १ मार्च २०२४ ने पारित केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८ *(४)* खालील तरतुदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल / बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ *(४)* नुसार केलेल्या फेरबदलांची / बदलांची सूची परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर फेरबदल / बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा खालील नमूद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला असून, उपलब्ध आहे.

(१) मुख्याधिकारी, कवठेमहांकाळ नगरपंचायत.

(२) सहायक संचालक, नगररचना विभाग, सांगली.

कवठेमहांकाळ शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल / बदलांची सूची

एम १- आरक्षण क्रमांक १३ APMC रद्द करून रहिवास विभागात समाविष्ट.

एम २- आरक्षण क्रमांक २३ डंपिंग ग्राऊंड स्थलांतरित करून गट नंबर २१५ येथे शासकीय जागेत घेऊन मूळ जागा शेती विभागात समाविष्ट व अस्तित्वातील डंपिंग यार्डचे वापर रद्द.

एम ३- आरक्षण क्रमांक २४ कत्तलखाना स्थलांतरित करून गट नंबर २१५ येथे शासकीय जागेत घेऊन मूळ जागा शेती विभागात समाविष्ट.

एम ४- आरक्षण क्रमांक ३५ STP च्या पूर्वेकडील उर्वरित ओढ्यापर्यंतचे क्षेत्र समाविष्ट.

एम ५- आरक्षण क्रमांक २० गार्डन रद्द करून मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम ६- आरक्षण क्रमांक २७ मटण मार्केट स्थलांतरित करून गट नंबर ५४८ येथे शासकीय जागेत पाणी टाकीशेजारी स्थलांतरित करून मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम ७- आरक्षण क्रमांक ३७ पार्क रद्द करून मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम ८- आरक्षण क्रमांक १ म्हाडा स्थलांतरित करून गट नंबर ५४८ येथे शासकीय जागेत घेऊन मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम ९- आरक्षण क्रमांक ३९ मॅटर्निटी होम स्थलांतरित करून सि.स. क्रमांक १६३२ येथे शासकीय जागेत घेऊन मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम १०- आरक्षण क्रमांक १६ पार्किंग स्थलांतरित करून सि.स. क्रमांक ११३६ येथे शासकीय जागेत घेऊन मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम ११- आरक्षण क्रमांक ३८ कम्युनिटी हॉल/लायब्ररी स्थलांतरित करून सि.स. क्रमांक ७९१ येथे शासकीय जागेत घेऊन मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम १२- आरक्षण क्रमांक २८ फायर ब्रिगेड स्थलांतरित करून गट नंबर १५२४/ब येथे नगर परिषदेच्या मालकीचे जागेत घेऊन त्या जागी Municipal Staff Quarters आरक्षण समाविष्ट.

एम १३- आरक्षण क्रमांक १२ cremation ground रद्द करून मूळ जागा शेती विभागात समाविष्ट.

एम १४- आरक्षण क्रमांक २९ APMC रद्द करून मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम १५- आरक्षण क्रमांक ४० प्ले ग्राउंड रद्द मूळ जागा रहिवास विभागात समाविष्ट.

एम १६- आरक्षण क्रमांक २३ व २४ साठी सोडणेत आलेला पूर्व-पश्चिम १२ मीटर Internal Road हा रद्द करून मूळ जागा शेती विभागात समाविष्ट.

एम १७- गट नंबर १७० ते १५८ ते १६० मधून जाणारा दक्षिण-उत्तर Internal १८ मीटर रोड हा गट नंबर १७० मधील असणाऱ्या दफनभूमीमुळे १२ मीटर करून रस्त्यातील जागा उर्वरित क्षेत्रात समाविष्ट.

एम १८- गट नंबर १५५९ मधून जाणारा ३० मीटर रिंग रोड हा गट नंबर १५५९ व १५६० सरबांधावरून घेऊन रस्त्यातील जागा उर्वरित क्षेत्रात समाविष्ट.

एम १९- गट नंबर १४३ व १४४ मधील पूर्व-पश्चिम Internal १५ मीटर रोड हा रद्द करून सद्या वापरात असणाऱ्या गट नंबर १४४ च्या दक्षिणेकडील सरबांधावरील रोड वरून नकाशात दर्शविलेनुसार १५ मीटर ऐवजी १२ मीटर दुरुस्ती.

एम २०- गट नंबर ३०० ते २९५ ते ५४७ मधून जाणारा ३० मीटर रिंगरोड हा त्याच्या पूर्वेकडील गट नंबर २८३ व २९० मधून जाणाऱ्या रोडशी Alignment नकाशात दर्शविलेनुसार दुरुस्ती करून रिंगरोडचे आतील भाग रहिवास विभागात समाविष्ट.

एम २१- गट नंबर ५१८ मधून जाणारा १८ मीटर रुंदीचा रस्ता १२ मीटर करून नकाशात दर्शविलेनुसार दुरुस्ती.

एम २२- गट नंबर १४९६ मधून जाणारा उत्तर-दक्षिण Internal १२ मीटर रोडच्या ऐवजी रोड length च्या आवश्यकतेनुसार ९ मीटर रोड करून नकाशात दर्शविलेनुसार दुरुस्ती.

एम २३- गट नंबर १५१० व १५११ च्या दक्षिणेच्या सरबांधावरून Internal ९ मीटर रोड नव्याने प्रस्तावित करून नकाशात दर्शविलेनुसार दुरुस्ती.

